

# कार्याध्यक्षांचे मनोगत

प्रिय सन्माननीय सभासद मंडळी

आपण सर्वांना माझा सप्रेम नमस्कार

सर्वप्रथम गोवा निवडणूक अधिवेशनात आपण मला आणि माझ्या सहकाऱ्यांना भरपूर पाठिंबा देऊन निवडून आणल्या बद्दल आपण सर्वांच्या प्रति मनःपूर्वक आभार व्यक्त करू इच्छितो. आपल्या पैकी बऱ्याच लोकांशी गोवा निवडणूक दरम्यान किंवा निवडणुकी नंतर माझा अनौपचारिक संवाद झालेला आहे . पण काही लोकांशी हा माझा पहिलाच संवाद आहे. निवडणूक निमित्ताने माझे बऱ्याच प्रांतात फिरणे झाले. तेथे आणि तसेच गोवा येथे सुद्धा माझे बऱ्याच सभासदांशी बोलणे झाले. बृहन्महाराष्ट्र मंडळाचा भावी कार्याध्यक्ष म्हणून खूप सभासदांनी आपले मत, आपले म्हणणे आणि तसेच त्यांच्या बृहन्महाराष्ट्र मंडळा कडून असलेल्या अपेक्षा माझ्या पर्यंत पोहोचविल्या आहेत. ह्या संपर्कात मला एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली ज्याला वेगवेगळया सभासदांनी दुजोरा ही दिला आणि ती म्हणजे, बृहन्महाराष्ट्र मंडळ मागील काही वर्षांत राष्ट्रीय पातळी वर आपले तेजोवलय हरवून बसलंय. महाराष्ट्रा बाहेरील महाराष्ट्रीय जनांचा राष्ट्रीय पातळीवर एकमेव संस्थागत आवाज असून देखील मंडळाला हवी तशी प्रसिद्धी आणि हवा तसा वचक निर्माण नाही करता आला. ही खंत जशी इतर सभासदांना वाटते तशीच ती मला देखील वाटते. काहीही झालं तरी योग्य गोष्टींवर सरकार दरबारी आपला आवाज पोहोचलाच पाहिजे एवढी धमक बृहन्महाराष्ट्र मंडळात असलीच पाहिजे. मला माहित आहे कि हे एक दिवसाचे किंवा दोन-तीन वर्षाचे काम नाही, हे सतत प्रयासाने संस्था बळकट झाल्यावरच होऊ शकेल. तरी माझे प्रयत्न याच दिशेने असणार आहेत ह्याची हमी मी आपण सर्वांस देऊ इच्छितो. सभासद हो, २५ मार्च २०१८ रोजी नवीन कार्यकारिणी ने कार्यभार ग्रहण केला आणि लगेच दिनांक ५ एप्रिल ला स्थापना दिवस चा सुयोग साधून विस्तारित कार्यकारिणी ची बैठक हैदराबाद येथे संपन्न झाली. ह्या बैठकीत बऱ्याच मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली आणि भविष्यात आपल्याला संस्थेस कुठे घेऊन जायचे आहे त्या संबंधी बरेच निर्णय घेण्यात आले.

सभासद आणि संस्था ह्यांचे दरम्यान नेहेमी संवाद असावा, सभासदांना संस्थे संबंधीची, बैठका आणि निर्णय संबंधीची प्रत्येक माहिती शक्यतो लवकर मिळायला हवी आणि तसेच सभासदांना देखील आपले म्हणणे कार्यकारिणी पर्यंत पोहोचाविण्यास मध्यम उपलब्ध हवे. ह्याचीच दाखल घेऊन मंडळाचे सुधारित संकेतस्थळ इंटरनेट वर कायम करण्यात आले आहे. **"सभासद संवाद"** ह्या विकल्पाच्या माध्यमातून तसेच 8989792200 ह्या व्हाट्सप्प नंबर वर समस्त सभासद आपला संदेश कार्यकारिणी पर्यंत प्रेषित करू शकतात. ह्या शिवाय ईमेल हा मध्यम तर आहेच. ह्या प्रक्रियेत काही महत्वाच्या किंवा लक्षवेधी सूचना प्राप्त सभासदां कडून झाल्या तर त्या विचारार्थ सुद्धा घेतल्या जाऊ शकतात.

बृहन्महाराष्ट्र मंडळ हे मुळात मराठी भाषिकांच्या संस्थाचं आणि त्यांच्या मार्फत मराठी भाषिकांचे प्रतिनिधित्व करणारी संस्था आहे पण माझ्या असे लक्षात आले आहे कि मागील काही वर्षात ज्या प्रमाणात व्यक्तिगत आजीव सदस्य बनविले गेले त्या प्रमाणात संस्थागत सदस्यांचे प्रमाण नाही वाढले. तरी ही विसंगती दूर करण्याची गरज लक्षात घेऊन काही काळ सर्व लक्ष संस्थागत सदस्यते वर राहील.

दुसरा एक महत्वाचा मुद्दा म्हणजे सांप्रत मंडळाची आर्थिक परिस्थिती. जानेवारीत संपन्न झालेल्या गोवा अधिवेशन चा जमा खर्च बघता असे लक्षात आले कि मंडळाच्या आर्थिक व्यवहारांचे नियोजन आणि प्रबंधन सुरळीत नाही. अंदाजपत्रक किती आणि खर्च किती यातले तारतम्य दृष्टीस पडत नाही. येथे मी स्पष्ट करू इच्छितो कि माझा रोख मागील कार्यकारिणी किंवा कोण एका व्यक्तीस दोषी ठरविण्याचा बिलकुल नाहीये पण आता पर्यंत मागील मोठ्या कालखंडात संस्थेची गंगाजळी वाढविण्याचा किंवा आर्थिक आत्मनिर्भरता प्राप्त करण्याचा फारसा प्रयत्न झालेला दिसत नाही. काही ठिकाणी नवीन प्रकल्पांचे सुतोवाच जरूर झाले पण त्यानंतरचा पाठपुरावा बिलकुल केला गेला नाही. आज ही मंडळ आपल्या गरजा भागविण्या करिता सदनिकेचे आणि व्याजाचे उत्पन्न यावरच बहुतांशी अवलंबून आहे. अधिवेशने, सम्मेलने, माय मराठी मुखपत्र हे कायम स्वरूपाचे मिळकतीचे साधन असले पाहिजे पण दुर्दैवाने अशी परिस्थिती नाहीये. अधिवेशने आणि सम्मेलने हे तर द्रव्य गळती चे पर्याय झाले आहेत. अश्या निराशाजनक परिस्थिती मधून संस्थे ला बाहेर काढण्याचे पूर्ण प्रयत्न सर्वांनाच करावे लागणार आहेत. याच संदर्भात कार्यकारिणीने “मधुकोष योजना” स्थापित केली आहे तरी आपण सर्वांनी ह्या योजनेस हात भार लावावा ही विनंती. योजनेचा तपशील संकेतस्थळावर बघता येईल. तसेच आपल्या संस्थेला प्राप्त होणाऱ्या सर्व देणग्यांवर प्राप्ती कर खात्या कडून कलम ८० G अंतर्गत सवलत मिळवून घेण्या साठी पण प्रयत्न करीत आहोत.

सभासद हो, माझा दृढ विश्वास आहे कि पारदर्शिता आणि जबाबदारी अर्थात Transperancy and Accountability हे दोन्ही कुठल्या ही सामाजिक संस्थेच्या सुचारू संचालना करिता मुख्य आधार म्हणून काम करत असतात. ही दोन्ही तत्त्वे सभासदांना कार्यकारिणीच्या जवळ आणून सोडतात आणि परोक्ष रित्या सभासदांना निर्णय प्रक्रियेत देखील सामील करून घेतात. आपल्या कार्यपद्धतीत पारदर्शिता आणण्यासाठी माझा आग्रह आणि प्रयत्न असणार आहे कि या पुढे सर्व महत्वपूर्ण निर्णय, सूचना आणि बैठकींचा अहवाल (अपुष्ट किंवा पुष्टीकरण झालेला अश्या टिपणा सह) आपण इंटरनेट संकेत स्थळावर सभासदांच्या माहिती करिता उपलब्ध केले जातील.

सभासद हो, कुठल्याही संस्थेची प्रगती एका मुख्य सिद्धांतावर आधारित असते आणि ते म्हणजे बदलत्या काळाच्या गरजेनुरूप ती संस्था स्वतःला कितपत बदलू शकते आणि आपल्या प्रगतीचा वेग वाढवू शकते. हे सर्व साध्य करायचे झाले तर संस्थांच्या बद्दल दोन गोष्टी बघाव्या लागतात. एक तर त्या संस्थेची घटना किती लवचिक आहे कि काळानुरूप किती बदल करावयाची परवानगी देते आणि दुसरी म्हणजे आवश्यक बदल करण्यास घटनेची दुरुस्ती किती लवकर केली जाऊ शकते. संस्थेच्या प्रगती साठी ह्या पैकी किमान एक तरी घटक आवश्यक असतो. दुर्दैवाने आपल्या संदर्भात ह्यापैकी कुठलीच गोष्ट लागू पडत नाही. अति वयस्क आणि अपंग सभासदांना देखील मतदान करावयाचे असल्यास लांब प्रवास करून अधिवेशन स्थळ गाठावे लागते आणि सदस्य संस्था १० सभासदांची असो वा १००० सभासदांची, प्रत्येक संस्थेला समतुल्य मताधिकार आहे दोन दोन मतांचा. असे एक दोन नाहे तर बरेच मुद्दे आहेत ज्यांच्यावर पुनर्विचार करण्याची फार गरज आहे. अश्या सामान्य व्यवहारज्ञानाच्या चौकटीत न बसणाऱ्या बऱ्याच गोष्टी आहेत म्हणून घटना दुरुस्ती आणि निवडणूक नियमावली ह्याचे कार्य प्राथमिक वरीयतेने कृतीत उतरावे ही इच्छा आहे व तदनुसार पाऊले उचललेली आहेत.

मंडळी मला वाटते कि ह्या पुढे बृहन्महाराष्ट्र मंडळा ला पुढे कसे आणायचे आणि पुढे कसे घेऊन जायचे ह्या सबंधी चा माझा दृष्टीकोण मी स्पष्टपणे मांडयचा प्रयत्न केलाय तरी या संदर्भात आपल्या सूचना आणि सुझाव आपण ईमेल, संकेत स्थळ, व्हॉटसप्प च्या माध्यमातून पाठवले जाऊ शकतात ज्याची योग्य ती दाखल घेण्यात येईलच.  उपस्थित आवाहन पेलायला थोडं जड असेल पण अशक्य नाही. आपण सर्वांना थोडा चाकोरी बाहेर देखील विचार करावा लागेल. माझा विश्वास आहे कि

**क्षितीजापलीकडे पाहण्याची दृष्टी असेल,**

**तर क्षितीज नक्की गाठता येतं.**

आमच्या कार्यकारिणीच्या कारकिर्दी नंतर मंडळाची स्थिती उत्तुन्गते कडे नेली कि आणखी गर्तात ढकलली ह्यावरच  आम्ही पुढील निवडणूकीत सभासदांना सामोरं जायचं आहे याची मला जाणीव आहे. तरी आपण सर्वांच्या सहयोगाने आपण आपली लक्ष्ये अवश्य सर करू हा विश्वास आहे .

धन्यवाद

आपलाच